# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – २६

## (सभावृत्तांत)

दिनांक–१३/०९/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १३/०९/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.कुटे निर्मला संजय
८) मा.कोमल दिपक मेवानी
९) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१२) मा.राजू मिसाळ
१३) मा.अमित राजेंद्र गावडे
१४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालकनगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील,मा.तुपे, मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोराटे,मा.खोत,मा.राऊत,मा.बहुरे,मा.दांगट-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे,मा.इंगळे,मा.तांबे,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.पाटील, मा.घुबे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २१) सहा.आयुक्त (भुमि आणि जिंदगी विभाग) यांचेसाठी नवीन वाहन खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक २२) बार्सिलोना-स्पेन येथील मा.महापौर यांच्या दौ-याच्या खर्चास मान्यता देणेबाबत – मा.उत्तम कैंदळे, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २३) प्र.क्र.१८ मध्ये बहुउद्देशिय स्पोर्ट कॉम्पलेक्स बांधणे या कामास प्रकल्प सल्लागार नेमणेबाबत–मा.माधुरी कुलकर्णी, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २४) प्र.क्र.१० मध्ये सांस्कृतिक केंद्र करणेकामी वास्तुविशारद व सल्लागार नेमणेबाबत – मा.वैशाली काळभोर, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २५) जुनी सांगवी येथील मश्चिंद्र धोंडीबा ढोरे व्यापारी संकुलमधील गाळे भाडेने देणेबाबत – मा.उषा मुंढे, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २६) ठ.क्र.८९१ मध्ये मजकुर दुरुस्ती करणेबाबत - मा.अमित गावडे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २७) ठ.क्र.८७९ मध्ये मजकुर दुरुस्ती करणेबाबत - मा.लक्ष्मण उंडे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक २८) उद्यान विभागाचे अ,ब व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणा-या उद्यानांच्या कामकाजासाठी लॉन मोअर खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक २९) ठ.क्र.६८१ मध्ये मजकुर दुरुस्ती करणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३०) बोपखेल येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसीत करणे या कामासाठी वास्तुविशारद नेमणेबाबत-मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३१) दिघी येथील कामासाठी वास्तुविशारद नेमणेबाबत-मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३२) पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाई उद्यानाच्या विकास कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेबाबत-मा.उषा मुंढे,मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३३) कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह साफसफाई थेट पद्धतीने करणेबाबत-मा.कुंदन गायकवाड, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३४) मा.स्थायी समिती सभा दि.१९/९/२०१७ रोजी आयोजित करणेबाबत-मा.कैलास बारणे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३५) श्री.ए.एच.जागडे,लिपिक (नगरसचिव विभाग) यांचा अपील अर्ज – मा.अमित गावडे, मा.उत्तम कैंदळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३६) श्री.व्ही.टी.अवसरे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज – मा.राजू मिसाळ, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३७) श्री.वासुदेव महादेव मांडरे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज – मा.कैलास बारणे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३८) श्री.कैलास गेणुभाऊ थोरात, कार्य.अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज – मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९) श्री.दिलीप श्रीरंग धुमाळ, उप अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज – मा.निर्मला कुटे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०) नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविल्या जाणा-या विविध कल्याणकारी योजनांना मुदतवाढ देणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

-----------

दिनांक ३०/०८/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २४) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक – ९२४ विषय क्रमांक – १

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकीय

सूचक – मा.आशा धायगुडे शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/४८०/२०१७ दि.०१/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील प्रयोगशाळा व रक्तपेढीकरीता तसेच इतर रुग्णालयाकरीता/दवाखान्याकरीता आवश्यक लागणारी लॅब केमीकल्स्/किटस्/ डिस्पोसिबल्स् साहित्य मेमाहेश्र्वरी सेल्स कार्पोरेशन यांचेकडून उत्पादित कंपनीच्या प्रचलित प्राईस लिस्टनुसार ३.२५% सुट घेऊन खरेदीकामी सन २०१७-२०१८ या वित्तिय वर्षामध्ये प्रयोगशाळा केमीकल व साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर रुग्णालय व दवाखाने आणि रक्तपेढी यांना केमीकल उपलब्ध करुन देणे ही बाब तातडीक असल्याने झालेल्या र.र.९९,२५,७५९/- चे खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता देवून तसेच सन २०१७-२०१८ या वित्तिय वर्षामध्ये प्रयोगशाळा केमीकल व साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर झालेला खर्च ई-निविदा र.रु.४ कोटी मधून वजा जाता उर्वरीत र.रु.३,००,७४,२४१/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९२५ विषय क्रमांक – २

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/३२२/२०१७ दि.०१/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

ब क व इ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रायमरी व सेकंडरी वेस्ट कलेक्शन तसेच अ, ड व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सेकंडरी वेस्ट कलेक्शन कामासाठी निविदा नोटीस क्रं.०६/२०१७-१८ व ०७/२०१७-१८ प्रसिध्द करणेबाबतची कार्यवाही सुरु असून,निविदा कार्यवाही पुर्ण होणेस अंदाजे ०४ महिने कालावधी लागणार आहे. तसेच अ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र.१४ व १७ मध्ये ३ टिपर वाहने व

प्रभाग क्र.१८ व १९ मध्ये २ कॉम्पॅक्टर वाहने घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे (प्रायमरी व सेकंडरी) कामकाज मे.बी.व्ही.जी.क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. यांचेमार्फत करणेत येत आहे. व त्यांना प्रति मे. टन र.रु.९११/- प्रमाणे बिल अदायगी करावी लागणार आहे, त्यास मान्यता व त्यामुळे वर नमूद केलेल्या कामासाठी मे. बी. व्ही. जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. यांना ०४ महिने अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत (नि.नो.क्र.५/२०११-१२ चे दराने) मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे खर्च **र.रु.४,०३,०१,५५६/-(अक्षरी र.रु.चार कोटी तीन लाख एक हजार पाचशे छप्पन फक्त)** अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामांस दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९२६ विषय क्रमांक – ३
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१४१/२०१७ दि.०४/०९/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१४/०८/२०१७ ते दि.२०/०८/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१४१/२०१७ दि.०४.०९.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – मा.मुख्यलेखापाल यांनी अजून आक्षेपित रकमा किती आहेत, विभागांकडून किती रेकॉर्ड येणे बाकी आहे. इ. बाबतचा तपशील मा.स्थायी समितीस सादर करावा.

----------

ठराव क्रमांक –९२७ विषय क्रमांक – ४
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कैलास बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/३२४/२०१७ दि.०१/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहतूक करणे या कामासाठी कामगार पुरविणेकामी मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्या कामाची मुदत दि.३१/०७/२०१७ अखेर संपुष्टात आली आहे. सध्या संस्थेमार्फत ५६ वाहनचालक, ६ सुपरवायजर व ९४ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. याकामाची नविन निविदा कार्यवाही सुरु करणेत आली आहे. त्यास काही महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. सावित्री महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांची ठेकेदार म्हणून दिनांक ०१/०८/२०१७ ते दिनांक ३०/११/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत (निविदा नोटीस क्र.५/२०१४-१५) मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या अंदाजे र.रु.७३,१०,०७२/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त

यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामांस दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९२८ विषय क्रमांक – ५

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/३२३/२०१७ दि.०१/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'अ' क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहतूक करणे या कामासाठी उपलब्ध वाहनांवर कामगार पुरविणेकामी मे.भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्या कामाची मुदत दि.३१/०७/२०१७ अखेर संपुष्टात आलेली आहे. याकामाची नविन निविदा कार्यवाही सुरु असून, त्यास अंदाजे ०४ महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे भारतीय महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. पिंपरी यांची ठेकेदार म्हणून दिनांक ०१/०८/२०१७ ते दिनांक ३०/११/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत (नि.नो.क्र.४/२०१४-१५) मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.६६,९८,०४०/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामांस दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९२९ विषय क्रमांक – ६

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/३२५/२०१७ दि.०१/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'फ' क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहतूक करणे या कामासाठी कामगार पुरवणेकामी मे. भारतीय महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. पिंपरी यांची कामाची मुदत दि. ३१/७/२०१७ अखेर संपुष्टात आली आहे. या कामाची निविदा कार्यवाही सुरू असून, त्यास काही महिने कालावधी लागणार आहे त्यामुळे मे.भारतीय महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. पिंपरी यांची ठेकेदार म्हणून दिनांक ०१/०८/२०१७ ते दिनांक ३०/११/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत (नि.नो.क्र.६/२०१४-१५) मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.७९,०२,२३२/- अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामांस दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९३०
विषय क्रमांक – ७
दिनांक – १३/०९/२०१७
विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.कैलास बारणे
अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/३२६/२०१७ दि.०१/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब व क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ०७ वॉर्डातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहतूक करणे या कामासाठी कामगार पुरविणेकामी मे. संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, दापोडी यांची कामाची मुदत दि.३१/७/२०१७ अखेर संपुष्टात आली आहे. या कामाची नविन निविदा कार्यवाही सुरू असल्याने, त्यास अंदाजे ४ महिने कालावधी लागणार आहे त्यामुळे मे. संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, दापोडी यांची ठेकेदार म्हणून दिनांक ०१/०८/२०१७ ते दिनांक ३०/११/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत (नि.नो.क्र.४/२०१५-१६) मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.५५,५०,७०४/- अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामांस दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय- १)** कायदा विभागाने ॲड.गिरिष गोडबोले यांना या केसकरिता नेमण्यात यावे. तसेच सगळे पॅरा आज पूर्ण करावेत.

**२)** अशा केसेसमध्ये आत्ता एपिअर झाल्यास ठेकेदार त्यातून पळवाट काढतात. यामुळे महापालिकेच्या केसेस लटकतात. महापालिकेकडून जागरुकपणे काम होत नाही, त्यामुळे हे सगळे प्रकार होतात. सर्व विभागांना सांगणे आहे की, सांगितलेली कामे वेळेत होत नाहीत. याबाबत प्रशासनाला सक्त ताकीद आहे.

**३)** आठ दिवसांत सगळे डॉक्युमेंटस् घ्यावेत, असे अधिका-यांना सांगितल्यानंतरही अधिकारी अजिबात संपर्क साधत नाहीत. अधिका-यांना फोन केल्यास ते उचलत नाहीत. आदेश केल्यास त्याची अंमलबजावणी सदस्यांनी करायची का प्रशासनाने करायची,प्रशासन पाठपुरावा करणार असेलतर आमची हरकत नाही. परंतू कोणी काम करायचे हे ठरवावे लागेल. सदस्यांच्या समित्या नेमल्या जातात पण प्रशासनाकडून समिती सदस्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत.

**४)** कंत्राटी कामगारांच्या पी.एफ./ई.एस.आय. संदर्भात सहा.आयुक्त मा.इंदलकर यांनी एजन्सी नेमून त्यांच्याकडून काम करुन घेण्याची जबाबदारी घेतली होती. परंतू एजन्सीकडून अद्यापही ते काम पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. ज्या दोन प्रभागांनी माहिती पुरवलेली नाही, त्या प्रभागांचे प्रभाग अधिकारी, एस.आय. तसेच यात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर सस्पेण्ड करायची कारवाई करावी.

**५)** नियमाप्रमाणे मूळ वेतनपत्रक किंवा वेजेस रजिस्टर हे ठेकेदाराने दर महिन्याच्या बीलाबरोबर दिले पाहीजे. त्यामुळे त्याची कॉपी त्या-त्या विभागाकडे उपलब्ध असली पाहीजे.

**६)** मे.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, दापोडी या संस्थेने एक चलन चार ठिकाणी वापरले हे कामगार कल्याण अधिकारी यांच्या लक्षात आले. त्याच व्यक्तीने कोर्टात केस दाखल केली आहे. याबाबतीत महापालिकेकडून फिर्याद दाखल झाली नाही. कोर्टाच्या हे निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. प्रशासनाला या प्रकरणाचे गांभिर्य दिसून येत नाही. प्रशासनाने हा विषय गांभिर्याने हाताळणारी, सन्मा.सदस्यांचे म्हणणे ऐकणारी अशी व्यक्ती नेमावी.

**७)** त्या ठेकेदाराने दि.२०/६/१७ रोजी कोर्टात रिट पिटीशन दाखल केले होते. मग आजपर्यंत कोर्टाला माहिती का पुरवली गेली नाही, याची माहिती देणेत यावी.

**८)** प्रशासनाने सहा.आयुक्त,मा.इंदलकर यांना फक्त पूर्णवेळ कामगार कल्याण विभागाचाच पदभार द्यावा. त्यांनी आणलेल्या एजन्सीला स्थायी समितीने त्वरीत मान्यता दिली होती. आज ठराव होऊन ३५ दिवस झाले आहेत. त्यांना १५ दिवसांची मुदत दिली होती. काम मुदतीत झालेले नाही.

**९)** इथून पुढे प्रशासनाकडून स्थायी समितीला सहकार्य मिळणार नसेलतर स्थायी समिती देखील प्रशासनाला सहकार्य करणार नाही. जी संस्था महापालिकेच्या विरोधात कोर्टात गेली आहे, त्या संस्थेविरोधात महापालिकेकडे सबळ पुरावे असतानादेखील काही कारवाई केली जात नाही, काही माहिती दिली जात नाही. ज्यांनी नियमबाह्य काम केले असेल त्या संबंधितांवर प्रशासनाने कारवाई निश्चित करणे अपेक्षित आहे. स्थायी समितीने आदेश केल्यानंतरसुद्धा जर त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडून होत नसेलतर, स्थायी समितीला देखील समितीचे काम करण्यात इंटरेस्ट नाही.

**१०)** समिती सदस्यांकडून गेले एक/दीड महिन्यांपासून ईएसआय/पीएफ या विषयावर वारंवार बोलले जाते आहे. परंतू त्यावर अंमलबजावणी झालेली नाही.

**११)** मा.कायदा सल्लागार यांना सांगण्यात येते की, दि.२१ सप्टेंबर २०१७ च्या आतमध्ये ही केस टेकींग ऑन बोर्ड असली पाहीजे. ज्या लोकांनी फसवणूक केली ते कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले पाहीजे. झोंबाडे नावाची व्यक्ती फेडरेशनची अध्यक्ष आहे. फेडरेशनच्या वतीने त्यांनी कोर्टात केस दाखल केली आहे. रिटर्न रिप्लायमध्ये त्यांचे फेडरेशन रजिस्टर्ड आहे का नाही,हे फेडरेशन रजिस्टर्ड नसेलतर बेरोजगार कसे दाखवले आहे, हा मुद्दा कोर्टाच्या निदर्शनास आणून द्यावा. या व्यक्तीने मागील सलग तीन टर्म निवडणूक लढवली आहे, त्यांच्या निवडणूकीचा जमा-खर्च त्यांनी निवडणूक विभागाकडे जमा केला असेलतर तो सुद्धा जोडून द्यावा. एक व्यक्ती किती दिवस/वर्ष बेरोजगार असू शकते, ती व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी होती का नाही, बेरोजगारीची व्याख्या काय, हे सगळे मुद्दे ॲड.गिरीष गोडबोले यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

**१२)** मा.सहा.आयुक्त,अष्टिकर साहेब यांना सांगणे आहे की, हे सगळे संस्थाचालक,यांचे भाऊ, पत्नी किंवा भावजय हे गेल्या १०/१५ वर्षांत निवडणूका लढलेले आहेत, हे सगळे रेकॉर्ड कोर्टापुढे आणावे.

**१३)** कंत्राटी काम करणा-या या महिला पगार दिला नाही म्हणून दररोज येऊन त्यांची व्यथा सांगत असतात. हे कामगार किती वाईट परिस्थितीत काम करत असतात हे सर्व प्रभाग अधिका-यांना माहित आहे. त्यांच्या अकाऊंटला फक्त तीन हजार, अडीच हजार रुपये जमा

होतात. त्यांची अशा पद्धतीने ठेकेदाराकडून पिळवणूक चालली असूनही महापालिका त्यांच्यासाठी काहीही करताना दिसत नाही.

**१४)** या विभागाचे विभागप्रमुख या नात्याने मा.अति.आयुक्त यांनी या विषयाचा पाठपुरावा करणे, महापालिकेवर कोण खटला दाखल करतोय, कामाला खो बसतोय याचा आढावा वेळोवेळी घेणे अपेक्षित होते. याचा आढावा घेऊन परिस्थिती स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देणे अपेक्षित होते.

**१५)** स्थायी समितीमध्ये सर्व विभागप्रमुख उपस्थित असतात. स्थायी समितीमध्ये ज्या विभागाच्या विषयावर चर्चा होते,आदेश दिले जातात,सूचना केल्या जातात. संबंधित विभागप्रमुखांनी ते नोटडाऊन करुन पुढील २/३ दिवसांत त्या विषयासंदर्भात बैठक घेऊन त्याचे पुढे काय झाले हे स्थायी समितीला रिपोर्टींग केले पाहीजे.

**१६)** ज्या-ज्या संस्थांनी एकच चलन हे चार वेगवेगळ्या महिन्यांमध्ये भरले आहे, ज्या प्रभागांत असे झाले आहे, हे तपासण्याची जबाबदारी ही त्या प्रभाग अधिका-यांची होती. त्यांनी ते तपासले नाही म्हणून त्या प्रभाग अधिका-यांवर निलंबनाची कारवाई झाली पाहीजे.

**१७)** या संस्थांनी खोटेपणा करुन महापालिकेची बदनामी केली आहे हे कोर्टाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी प्र.कायदा सल्लागार,मा.पवार साहेब, आपण स्वतः जातीने हजर राहायचे आहे. महापालिका वकीलांच्या फीसाठी लाखो रुपये खर्च करते, म्हणून केसच्या दिवशी नियुक्त केलेल्या वकिलांनी कोर्टात हजर राहीले पाहीजे.

**१८)** श्री.पवार (पी.एफ.एजन्सी) आपणास सांगण्यात येते की, उद्या संध्याकाळपर्यंत हा विषय सॉर्टआऊट झालेला पाहीजे. महापालिकेला आलेल्या नोटीसा,ठेकेदाराने दिलेली खोटी चलने ही सगळी माहिती ताब्यात घ्या. गठ्ठ्याने किती लोकांनी पी.एफ/ई.एस.आय. भरला आहे ही माहिती दोन दिवसांत द्यावी. सर्व प्रभाग अधिका-यांनी श्री.पवार यांना सहकार्य केले नाहीतर आपण त्याचे डायरेक्ट रिपोर्टींग मा.आयुक्त सो.यांच्याकडे करावे. उद्या सकाळपर्यंत सर्व माहिती अद्ययावत असली पाहीजे. सगळ्या प्रभाग अधिका-यांकडून ती माहिती घ्या. ज्यावेळी २/३ वर्षांपूर्वी आपण वर्कऑर्डर दिली होती, तेव्हापासून आत्तापर्यंत पी.एफ/ई.एस.आय. भरला आहे का ते बघावे.

**१९)** मा.मुख्यलेखापाल यांनी या विषयाच्या संपूर्ण प्रक्रियेत लक्ष घालावे. आपण स्वतः लक्ष घालून सर्व प्रभाग अधिका-यांना,कामगार कल्याण अधिकारी यांना, त्या एजन्सीला बोलवून घ्यावे.

**२०)** मा.आशादेवी दुरगुडे व मा.चंद्रकांत इंदलकर यांना कोणत्या विभागाचा पदभार देण्यात यावा याबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा. मा.आयुक्त साहेबांना विनंती असेन की, ज्या व्यक्तीला पदभार देणार आहोत, त्यास या कामाचा पूर्ण पदभार देण्यात यावा. सन्मा.अति.आयुक्त यांचा या विषयात काही सहभाग नसेलतर त्यांना या विषयातून बाजूला करुन टाकावे.

**२१)** इथून पुढे स्थायी समितीच्या बैठकीस बसताना महापालिकेतील कोण कोण अधिकारी काय काम पाहत आहेत, त्यांच्या कार्यकक्षा काय आहेत, कोण अधिकारी उत्तरे देणार आहेत, याची यादी प्रशासनाने द्यावी. जे अधिकारी कार्यक्षम नाहीत, त्यांना एकापेक्षा जास्त विभागांचा कार्यभार देऊ नये.

------------

ठराव क्रमांक –९३१ विषय क्रमांक – ८
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/४४८/२०१७ दि.०४/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.३/२०१४-१५ प्रसिध्द करुन मनपाचे अ,ब,क,ड,इ,फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईकामी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ६५ (स्वयंरोजगार/बेरोजगार) संस्थाकडून प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ नुसार ९२५ कामगारांचे कामास दि.१/८/२०१७ पासून ३ महिने अथवा मे.मुंबई हायकोर्टाचा आदेश झालेनंतर नवीन संस्थांना नेमणुक आदेश देईपर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस सद्याचा किमान वेतन दर र.रु.१२,३९२.४२ प्रमाणे ९२५ कामगारांचे मासिक खर्च र.रु.१,१४,६२,९८९/- नुसार ३ महिने कालावधीसाठी र.रु.३,४३,८८,९६७/-चे अपेक्षित खर्चास त्यांचेशी मुदतवाढ कालावधीचा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यास तसेच प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामांस दि.०१/०८/२०१७ पासून दि.३०/०९/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९३२ विषय क्रमांक – ९
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१९०/२०१७ दि.६/९/२०१७

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.4-2016/17 मधील अ.क्र.19 अन्वये दापोडी येथील ख्रिश्चन दफनभूमीमध्ये हायमास्ट दिवे बसविणेकामी (कासारवाडी उप विभागातील हायमास्टचे दिवे बदलणेकामी) मे.रूपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स, नि.र.रू.16,21,591/- (अक्षरी र.रू.सोळा लाख एकवीस हजार पाचशे एक्क्याण्णो फक्त) पेक्षा 6.00% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९३३ विषय क्रमांक – १०
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/२/कावि/२१६/२०१७ दि.३०/०८/२०१७

२) मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक १५ दिनांक ०६/०९/२०१७ नुसार

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V.) चालविण्याचे (मोटार

ड्रायव्हिंग) (T.R) प्रशिक्षण देणे ही योजना प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या अटी/शर्तीनुसार वस्तीपातळीवर राबविणेस तसेच या योजनेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V.) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग) (T.R) प्रशिक्षण देणेबाबत प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ मधील अट क्र.०७ मध्ये उत्पन्नाची अट र.रु.१,००,०००/- ऐवजी र.रु.२,००,०००/- करुन त्यानुसार प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मागणी असली तरी प्रस्तुत योजना राबवितांना विधवा व परितक्त्या महिलांसाठी उत्पन्नाची मर्यादा न ठेवता योजनेचा मोफत लाभ देण्यास त्याचप्रमाणे र.रु.१,००,०००/- उत्पन्न मर्यादेपर्यंत अर्जदार महिलांकडून सहभाग शुल्क न घेण्यास आणि र.रु.१,००,०००/- पेक्षा जास्त व र.रु.२,००,०००/- पर्यंत उत्पन्न असलेल्या महिलांकडून, मनपाने निर्धारीत केलेल्या प्रशिक्षण फी च्या २५% इतकी रक्कम सहभाग शुल्क म्हणून भरुन घेऊन त्यांना प्रशिक्षण देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय –** १) दि.१९/०९/२०१७ पर्यंत टेंडर फ्लोट करावे. महिलांना प्रशिक्षण देणा-या संस्थेचे टेंडर नोव्हेंबर महिन्यात फ्लोट झाले पाहीजे आणि याचा पाठपुरावा करुन स्थायी समितीला वेळोवेळी रिपोर्टींग करावे.

२) लाभार्थ्यांचे वय २५ पासून पुढे असे धरण्यात यावे.

३) उत्पन्नाची अट-यामध्ये एक लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या महिलांकडून सहभाग शुल्क घेऊ नये आणि एक लाखापेक्षा जास्त व दोन लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या महिलांकडून २५% सहभाग शुल्क घेवून आणि विधवा व परितक्त्या अश्या महिलांना मोफत प्रशिक्षण देण्यात यावे.

४) जी एजन्सी लोएस्ट रेट देईल, वर नमूद केल्याप्रमाणे त्या रेटच्या २५% असे प्रति लाभार्थी शुल्क घेण्यात यावे.

५) महिला सक्षमीकरण करण्यासाठी या महिलांना गाड्या घेण्यासाठी बॅक एंड सबसिडी द्यावी. यासाठी बँक ऑफ बरोडा किंवा भगिनी निवेदीता को-ऑप. बँक यांची मदत घेता येईल.

६) या महिलांकरिता माईंड गेमिंगसारखे ऑबजेक्टीव्ह प्रश्न ठेवावेत.

७) या योजनेत कारचालक याबरोबरच तीन चाकी रिक्शा, कचरा वाहतूक करणा-या गाडया यांच्याकरिता महिला ड्रायव्हर यांचाही समावेश करण्यात यावा. यातून त्यांना रोजगार उपलब्ध होईल.

८) ओला कंपनीबरोबर आपण टाय-अप करु शकतो. पिंपरी चिंचवड शहर क्षेत्रातील कंपन्यांबरोबर टाय-अप करु शकतो. त्याचबरोबर महिलाचालक असलेल्या गाड्यांना एक विशिष्ट रंग ठेवून, त्यावर महिला टॅक्सी असे नाव देणे असेही करु शकतो.

९) एक टार्गेट/उद्देश्य ठेवून हे काम करणे अपेक्षित आहे.

१०) आपण काय करणार आहोत, केवळ प्रशिक्षण देणार आहोत का त्यांना रोजगारही उपलब्ध करुन देणार आहोत,याबाबत प्रशासनाकडून एक प्रेसनोट प्रसिद्ध झाली पाहीजे. योजना आणताना ती पूर्णपणे फूलप्रफ अशीच आणली पाहीजे.

११) विषय क्रमांक १० अटीशर्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक –९३४ विषय क्रमांक – ११

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- १) मा.योगिता नागरगोजे, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव -

२) मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक १७ दिनांक ०६/०९/२०१७ नुसार

नागरवस्ती विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसाठी महाबळेश्वर येथे महिला बचत गटांनी सुरु केलेले उद्योग व्यवसाय पाहण्यासाठी अभ्यास दौरा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मागणी असलीतरी मा.महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसाठी महाबळेश्वर ऐवजी केरळ येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९३५ विषय क्रमांक – १२

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग-मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/कावि/४/१९०/२०१७ दि.०६/०९/२०१७

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नविन भोसरी रूग्णालय करिता ०७ नग फ्रिज व ०३ नग वॉशिंग मशीन खरेदीकामी ई निविदा सुचना क्रं.०१/२०१७-१८ प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,२१,१७५/- इतकी धरण्यात आलेली होती. सदर निविदेमध्ये दोन निविदाकारांनी भाग घेतला होता.

१.मे.Synergetic Automation Pvt.Ltd

२.मे.Austin Health Care

दोनच निविदा प्राप्त झाले असले कारणाने मा.आयुक्त सो.यांच्या शेरांकनास अधिन राहून प्राप्त झालेल्या निविदाकाराचे कागदपत्रे उघडून मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांच्या मान्य प्रस्तावानुसार प्राप्त निविदाकाराचे दरपत्रक दि.३१.०७.१७ रोजी उघडण्यात आले असता डबल डोअर रेफ्रिजरेटर करिता मे.Synergetic Automation Pvt.Ltd (र.रू.३३,०१५/-प्रति नग) व वॉशिंग मशीन करिता मे.Austin Health Care (र.रू.२८,४००/- प्रति नग) यांचे दर लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. लघुत्तम दराने साहित्य खरेदी केल्यास र.रू.३,१६,३०५/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त झालेले एकूण दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५१ टक्केनी कमी आलेले आहेत. ०७ फ्रिज व ०३ वॉशिंग मशीन खरेदीकामी करारनामा करून घेणेस व त्यानुसार येणा-या एकूण खर्च र.रू.३,१६,३०५/- खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९३६ विषय क्रमांक – १३
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/८०३/२०१७ दि.०६/०९/२०१७

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९३७ विषय क्रमांक – १४
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/५५२/२०१७ दि.०४/०९/२०१७
विषय - मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक कागद साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – मे.सुमित अगरवाल नावाचे जे प्रोप्रायटर आहेत, त्यांची पूर्ण फाईल स्थायी समितीकडे सादर करावी. तोपर्यंत पुढील सभेपर्यंत वि.क्र.१४ तहकूब करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक –९३८ विषय क्रमांक – १५
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – माहिती तंत्रज्ञान
सूचक – मा.आशा धायगुडे शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मा.तं.वि/९/कावि/४१४/२०१७ दि.०७/०९/२०१७
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नव्याने सुरु करणेत आलेल्या G व H क्षेत्रिय कार्यालयातील संगणक यंत्रणेकरीता आवश्यक नेटवर्कींग साहीत्य खरेदी करुन कार्यान्वीत करणेबाबत...

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९३९ विषय क्रमांक – १६
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय,आरोग्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/८२६/२०१७ दि.०८/०९/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालयातर्गत सांगवी दापोडी व नवी सांगवी येथील पवना नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणेकामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र. कक्षेका/आ१५/कावि/४९७/१७ दि.२८/०४/२०१७ अन्वये र.रू.१,००,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख फक्त) आगावू घेतलेली होती. सदरचे कामाकरिता एकूण १५० मजूरांवरती ७५०००/- (अक्षरी र.रू.पंच्याहत्तर

हजार फक्त) खर्च झालेला आहे उर्वरित र.रू.२५०००/- मनपा कोषागरात पावती क्र.C/१००१ दि.१४/०६/२०१७ अन्वये भरणा करण्यात आले आहे. कामगार मजूरी खर्च र.रु. १,००,०००/- झालेल्या खर्चाची बीले सादर केलेली आहे. सांगवी व दापोडी पवना नदी पात्रातील जलपर्णी काढणे कामी थेट पध्दतीने मजूराकामी खर्च झालेला आहे.तरी पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्रत्यक्ष झालेला एकूण खर्च र.रू.१,००,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९४० विषय क्रमांक – १७

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/७७७१/२०१७ दि.०८/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील सन २०१७ - १८ च्या अंदाजपत्रकातील स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षा अंतर्गत व शहर विकास आराखडा या लेखाशिर्षातून प्रस्तावात नमूद १ ते ८ कामांचे र.रू.६,३८,९९,०००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९४१ विषय क्रमांक – १८

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/७७७२/२०१७ दि.०८/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पाणीपुरवठा विभागाकडील शुध्द अशुध्द जलउपसा केंद्र सेक्टर क्र.२३ मधील प्रस्तावात नमूद १ ते ८ कामांची विभागाअंतर्गत र.रू.४९,५०,०००/- तरतूदीचे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९४२ विषय क्रमांक – १९

दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/७७७३/२०१७ दि.०८/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र. स्थापत्य/लेखा/३/कावि/१५९७/२०१७ दि.२८/८/२०१७ अन्वये र.रू.५.२० कोटींचे देय बिले. तरतुदी आभावी प्रलंबित आहेत. GST कराचा विचार करता सदर बिलांची अदायगी वेळेत होणे आवश्यक असल्याने प्रस्तावासोबतचे प्रपत्रानुसार सदरची रक्कम अखर्चित निधी शिल्लक रकमेतून वर्ग करणेस तसेच प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे स्थापत्य विभागाकडील र.रु.५.२० कोटींच्या बिलांशिवाय प्रस्तावासोबतच्या यादी मधील एकूण र.रु.४.७६ कोटींची १९७ बिले तरतुदी अभावी अदा करणे बाकी आहेत. सबब जीएसटी कराचा विचार करता

सदरची बिले सुद्धा अखर्चीत निधी शिल्लक रक्कमेतून वर्ग करणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – टेंडरींगसाठी २१ दिवसांचा किंवा २८ दिवसांचा ब्लॉक ठेवा. मुदतवाढ नको आहे. तसे परिपत्रक काढा, आदेश करा. मा.सह शहर अभियंता पाटील साहेब, आपण यासंदर्भात पाठपुरावा करावा.

ठराव क्रमांक –९४३ विषय क्रमांक – २०
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१९७/२०१७ दि.८/९/२०१७
विषय- सन 2016/17 करीता क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील कारंजे व धबधबे यांचे चालन व देखभाल दुरूस्ती करणेबाबत...

विषय क्रमांक २० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक –९४४ विषय क्रमांक – २१
दिनांक – १३/०९/२०१७ विभाग – भुमि आणि जिंदगी
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा. मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/४/कावि/७८१/२०१७ दि.१२/९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सहाय्यक आयुक्त भुमि आणि जिंदगी विभाग यांना कार्यालयीन कामकाजासाठी सध्या वाहन क्रमांक MH 14 P 4457 हे अम्बेसिडर वाहन उपलब्ध करुन देणेत आले आहे. शासन निकषानुसार सदर वाहनाचे आयुष्यमान संपलेले असल्याने सदर वाहन निर्लेखित करुन त्याऐवजी शासन निर्णय क्र.वाहन १०११/प्र.क्र.५८/११/विनियम दि.२७ मार्च २०१२ नुसार र.रु.६,००,०००/- (वाहनांची किंमत + विक्री कर + रजिस्ट्रेशन चार्जेस + व्हॅट + सहाय्यभुत साहीत्य (Accessories) यासह) किंमत मर्यादेपर्यंत वाहन खरेदी करता येईल. याकामी मे.टाटा मोटर्स लि. यांचेकडून थेट पद्धतीने करारनामा न करता Tata Zest XT RT 90 PS (BS IV) वाहन खरेदी करणेस व त्याकामी रक्कम रुपये ५,५८,६४२/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख अठ्ठावन्न हजार सहाशे बेचाळीस फक्त) मे.टाटा मोटर्स यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** मा.आयुक्त सो. यांचेकरीता नवीन वाहनाची व्यवस्था करण्यात यावी. तसेच मा.आयुक्त सो. यांचेकरिता असलेली गाडी महापालिकेच्या आवारात ज्याठिकाणी लावण्यात येते, त्याठिकाणी अन्य कोणीही नगरसदस्यांनी आपले वाहन उभे करु नये, याची दक्षता सुरक्षा विभागप्रमुखांनी आणि सुरक्षा विभागाने घ्यावी.

----------

ठराव क्रमांक –९४५ विषय क्रमांक – २२

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

**"Smart City Expo World Congress 2017" या बार्सिलोना,स्पेन येथे दिनांक १४ ते १६ नोव्हेंबर २०१७** या कालावधीत आयोजित होणा-या परिषदेच्या दौ-यास उपस्थित राहण्याचे महापौर मा.नितीन काळजे यांना **"Smart Mobility World Congress, Barcelona"** यांचेकडून निमंत्रण प्राप्त झाले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने केलेल्या विविध विकास कामांची ख्याती देश-विदेश पातळीवर पोहोचली असून शहराचा नुकताच स्मार्ट सिटीमध्ये समावेशही झाला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित देशांमधील स्मार्ट सिटींचे पायाभूत सुविधांचे नियोजन, विकास कामे, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण, वेगवान दळणवळण आणि परिवहन यंत्रणा यांचे प्रदर्शन आणि प्रात्यक्षिके या ठिकाणी आयोजित करण्यात येणार असून पिंपरी-चिंचवड शहरातील भविष्यकाळांतील विकासकामे आणि सुविधांच्या नियोजनांच्या दृष्टीने वरील निमंत्रणानुसार शहराच्या वतीने मा.महापौर यांना उपस्थित रहावयाचे असल्याने मे.व्हिजन हॉलिडेज्, प्राधिकरण, निगडी-४४ यांचेमार्फत सदर दौ-याचे नियोजन करण्यास दिनांक १४ ते १६ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत मा.महापौर यांचा व्हिसा, विमान प्रवास, निवास, चहा, नाश्ता, भोजन, स्थानिक प्रवास व इतर अनुषंगिक बाबींकामी पॅकेज टूर स्वरुपांत दौ-याचे आयोजन करणेकामी त्यांनी सादर केल्याप्रमाणे सर्व करांसह र.रु.५,२२,०००/- (अक्षरी रक्कम रु.पाच लाख बावीस हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९४६ विषय क्रमांक – २३

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.माधुरी कुलकर्णी, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.१८ मध्ये बहुउद्देशिय स्पोर्ट कॉम्पलेक्स बांधणे (आरक्षण क्र.२३३ व २३४) या कामासाठी प्रकल्प सल्लागार नेमणुक करणे आवश्यक आहे. तरी सद्यस्थितीमध्ये मनपामार्फत प्रकल्प सल्लागारासाठी र.रु.५० लाख पर्यंतचे कामासाठी ३% इतकी सल्लागार फी व ५० लाख वरील कामासाठी २.००% इतकी फी अदायगी करणेत येते. यामध्ये प्रिटेंडरींगसह नियोजित प्रकल्पाचे आराखडे तयार करणे, नकाश तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे,स्ट्रक्चरल डिझाईन देणे, कामावरील सुपरव्हिजन करणे इत्यादी बाबींचा समावेश राहील. उपरोक्त कामाचे स्वरुप पाहता त्या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ वास्तुविशारद नेमणुक करणे योग्य आवश्यक आहे.

सबब प्रकल्पाची आवश्यकता व निकड लक्षात घेता प्रभाग क्र. १८ मध्ये बहुउद्देशिय स्पोर्ट कॉम्पलेक्स बांधणेच्या (आरक्षण क्र.२३३ व २३४) प्रकल्पासाठी मे.शिल्पी आर्किटेक्टस् यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व प्रकल्प तांत्रीकदृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना याकरीता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापुर्ण कामासाठी लघुत्तम निविदा दराच्या २.००% फी (सर्व करांसहीत) अशाप्रकारे फी अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९४७ विषय क्रमांक – २४

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.वैशाली काळभोर, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या अंदाजपत्रक सन २०१७-१८ मध्ये इमारत योजना लेखाशिर्षाखाली पान/अ.क्र.-१२४/५७ वर प्रभाग क्र.१० मध्ये सांस्कृतिक केंद्र करणे या कामाचा समावेश आहे. सदर आकुर्डी गावातील स.नं.-१८० येथील म.न.पा.ची करसंकलन कार्यालय इमारत पाडुन त्याठिकाणी सामाजिक सभागृह/सांस्कृतिक केंद्र बांधणेकामी मे.एस.के.असोसिएटस् चे भागीदार श्रीदयानंद शिंदे यांची निविदापुर्व/निविदा पश्चात कामासाठी सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व त्यासाठी त्यांस मनपाच्या प्रचलित दरानुसार निविदापुर्व कामासाठी स्विकृत निविदा किंमतीच्या र.रु.५० लाखापर्यंत ३% व र.रु.५० लाखाच्या पुढे २% अधिक वस्तु व सेवाकर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९४८ विषय क्रमांक – २५

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.उषा मुंढे, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

मश्चिंद्र धोंडीबा ढोरे, व्यापारी संकुल, जुनी सांगवी, येथील गाळे खालीलप्रमाणे भाड्याने देणेत आले आहेत.

१) गाळा क्र.१ - श्री.दिलीप दत्तात्रय उपलेंचवार, र.रु.२६००/-
२) गाळा क्र.२ - श्री.संजय लक्ष्मीकांत कर्नावट, र.रु.२३६३/-
३) गाळा क्र.३ - श्री.वसंत दुष्यंतराव पाटणकर, र.रु.२२८९/-
४) गाळा क्र.४ - श्री.कांतीलाल मिश्रीलाल खिंवसरा, र.रु.२२८९/-

सबब वर नमुद केलेल्या गाळेधारकांना वरील भाडे दराने + मिळकत कर व सेवाकर यांसह सदर गाळे दिर्घ मुदतीने चालविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९४९ विषय क्रमांक – २६

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.अमित गावडे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.८९१, दि.३०/८/२०१७ मध्ये "कु.निलेश सुर्यकांत अंबाडरे" हा मजकुर दुरुस्त करुन त्याऐवजी "कु.निलेश सुर्यभान अंबाडरे" हा मजकुर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५० विषय क्रमांक – २७

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.लक्ष्मण उंडे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८७९, दि.३०/०८/२०१७ मध्ये कोटेशन नोटीस क्र.१५/२०१५-१६ असे नमुद करणेत आले आहे. त्यामध्ये कोटेशन नोटीस क्र.०४/२०१७-१८ अशी दुरुस्ती करून सदर दुरुस्तीसह मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५१ विषय क्रमांक – २८

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/२/कावि/१७५८/२०१७ दि.२२/८/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा उद्यान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.१५/२०१५-१६ करीता मनपाचे उद्यान विभागाचे अ,ब व फ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणा-या उद्यानांच्या कामकाजासाठी लॉन मोअर खरेदी करणेबाबत मे.एकदंत इक्युपमेंट प्रा.लि. कोटेशन नोटीस र.रु.१,९५,८०७/- (अक्षरी र.रु.एक लाख पंच्याऩ्नव हजार आठशे सात फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा (०.३१% कमी) कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उद्यान/२/कावि/१७५५/२०१७ दि.२२/०८/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याचे त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –९५२ विषय क्रमांक – २९

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.६८१, दि.१९/०७/२०१७ मधील "या शौचालयामुळे या परिसरात दुर्गंधी पसरुन घाणीचे साम्राज्य होऊ शकते म्हणुन त्यास स्थानिक नागरिकांचा विरोध आहे तरी या ठिकाणचे सार्वजनिक शौचालय रद्द करुन" हा मजकुर वगळण्यात यावा व त्याऐवजी "ते पुर्ण

करण्यास तसेच त्याचे जवळ पास” हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५३ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव...

बोपखेल येथील उद्यानासाठी आरक्षण असलेली जागा क्र.२/१६२ मनपाच्या आगाऊ ताब्यात आलेली आहे. सदर जागेवर उद्यान विकसीत करणेत येणार आहे. सदर उद्यानाचे नकाशे, अंदाजपत्रक तयार करणेसाठी मनपा पॅनलवरील वास्तुविशारद मे.किमया असोसिएटस् (आर्किटेक्ट-माणिक बुचडे) यांची नेमणूक करणेस तसेच त्यांना मनपाचे प्रचलित दरानुसार म्हणजेच र.रु.५० लक्षचे पर्यंतचे कामास ३% फी व र.रु.५० लक्षचे पुढील कामास २% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५४ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव...

दिघी येथील आरक्षण क्र.२/१२२ व आरक्षण क्र.२/१३९ येथे शाळा इमारत बांधणे व दिघी येथील आरक्षण क्र.२/१२८ व २/१३५ येथे दफनभूमी व स्मशानभूमी विकसीत करणेकामी मनपा पॅनलवरील वास्तुविशारद मे.किमया असोसिएटस् (आर्किटेक्त – माणिक बुचडे) यांची नेमणूक करणेस तसेच त्यांना मनपाचे प्रचलित दरानुसार म्हणजेच र.रु.५० लक्षचे पर्यंतचे कामास ३% फी व र.रु.५० लक्षचे पुढील कामास २% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५५ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.उषा मुंढे, मा.माधुरी कुलकर्णी यांचा प्रस्ताव...

पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यान विकसीत करण्याचे काम चालु आहे. या नि.क्र. (१५/०१/१६-१७) र.रु.४,२०,८०,६५७) उद्यानाचे आराखडे बनविण्याचे काम मे.सी.बी.ए.लॅन्डस्केप अँड इन्फ्रा. प्रोजेक्टस् यांना देणेत आलेले आहे त्यांनी सदर प्रकल्पासाठी व्यवस्थापन सल्लागार म्हणून मान्यता मिळणेस विनंती केलेली आहे. त्यांना अशाप्रकारच्या विशेष कामाचा अनुभव आहे. त्यांना मनपा नियमानुसार १.२५% फी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५६ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.कुंदन गायकवाड, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह साफसफाईचे कामकाज दि.३१/०७/२०१६ रोजी संपलेले असुन सदर ठिकाणचे कामकाज यापुर्वीच्याच निविदा नोटीस क्र.३/२०१५-१६ मध्ये नमुद केलेल्या दराप्रमाणेच थेट पद्धतीने श्री.दत्त एंटरप्रायजेस, धावडे वस्ती, भोसरी, पुणे ३९ यांना २ वर्ष कालावधीसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५७ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.कैलास बारणे,मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

दि.२०/०९/२०१७ रोजी मा.महापालिका सभा असल्याने दि.२०/०९/२०१७ ची मा.स्थायी समिती सभा दि.१९/०९/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५८ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.अमित गावडे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.ए.एच.जागडे,लिपिक (नगरसचिव विभाग) यांचा अपील अर्ज

विषय क्र.३५ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३५ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९५९ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.राजू मिसाळ, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.व्ही.टी.अवसरे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज...

विषय क्र.३६ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३६ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९६०　　　　　　　　　　विषय क्रमांक – ३७

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.कैलास बारणे　　　　　　　　　　अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.कैलास बारणे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.वासुदेव महादेव मांडरे, कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज...

विषय क्र.३७ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३७ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९६१　　　　　　　　　　विषय क्रमांक – ३८

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे　　　　　　　　　　अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.उषा मुंढे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव...

विषय - श्री.कैलास गेणुभाऊ थोरात, कार्य.अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज...

विषय क्र.३८ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३८ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९६२　　　　　　　　　　विषय क्रमांक – ३९

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.निर्मला कुटे　　　　　　　　　　अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.निर्मला कुटे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

विषय- श्री.दिलीप श्रीरंग धुमाळ, उप अभियंता (विद्युत) यांचा अपील अर्ज...

विषय क्र.३९ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३९ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –९६३　　　　　　　　　　विषय क्रमांक – ४०

दिनांक – १३/०९/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे　　　　　　　　　　अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सन २०१७-१८ या वर्षाकरीता एकुण १४ योजनांना दि.०९/१०/२०१७ पर्यंत कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

(पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने गणेशोत्सव  काळात पिंपरी-चिंचवड फेस्टीवल आयोजित केला होता. मा.तुपे,मा.प्रशांत पाटील,मा.इंगळे,मा.संजय कांबळे व त्यांच्या टीमने पिंपरी चिंचवड फेस्टीवलचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल मा.स्थायी समितीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.)

**निर्णय-** **१)** शहरातील प्रभागांतील व्यायामशाळा विविध संस्थांना करारनामा करुन दिल्या जातात. त्यावेळी ती वास्तू/जागा, त्या व्यायामशाळेतील साहीत्य, इ. सर्व महापालिका पूरवते. याशिवाय त्या संस्थेला दरमहा र.रु.दोन हजार दिले जातात. महापालिकेच्या व्यायामशाळा जी संस्था चालवते, त्याच संस्थेने सर्व देखभाल,दु रुस्ती,साहित्य उपलब्ध करणे इ. गोष्टी पाहील्या पाहीजेत. महापालिकेच्या जलतरणांचा खर्च हा उत्पन्नापेक्षा कितीतरी अधिक असल्याचे दिसून येते आहे. याबाबत एक निश्चित निर्णय घेण्यात आला पाहीजे.

**२)** मागील स्थायी समितीमध्ये स्थायी समितीने मान्यता दिलेले व्यायामशाळेसंदर्भातील जितके विषय आहेत, उद्यान विभागासंदर्भातील जे विषय आहेत, त्या सर्व विषयांच्या करारनाम्याच्या फाईल्स पुढील आठ दिवसांच्या आत, पुढील स्थायी समिती सभेपूर्वी मा.सभापती यांच्याकडे सादर करणेबाबत आदेश केले होते. परंतू प्रत्यक्षात करारनाम्याच्या फाईल्स सादर झालेल्या नाहीत. समिती सभांमध्ये सन्मा.सदस्यांकडून प्रस्ताव सादर केले जातात, ते समिती सभांमध्ये मंजूर देखील होतात. परंतू प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसते आहे. आहे त्या ठेकेदाराला मुदतवाढ दिली जाते पण सदस्य प्रस्ताव चालत नाही. एकूण ४८ मंजूर विषयांपैकी फक्त ६ विषय हे सदस्य प्रस्ताव होते. तरी त्याची आजपर्यंत अंमलबजावणी झाली नाही. सदस्यांनी समिती सभेत मंजूर केलेल्या ठरावांची अंमलबजावणी प्रशासनाकडून झालीच पाहीजे. सदस्यांचाही मान राखलाच पाहीजे. अधिका-यांनी परस्पर निर्णय घ्यायचा नाही. एककल्ली प्रशासन चालणार नाही. पुढील वेळी स्थायी समितीस येताना स्थायी समितीचे अधिकार काय आहेत हे घेऊन यावे. मा.अति.आयुक्त आपण आपले म्हणणे स्थायी समिती सभेतच मांडावे.

**३)** मुदतवाढीसाठी, कार्योत्तर मान्यतेसाठी विषय समितीसमोर आणू नयेत. कराराची मुदत संपत आली आहे का नाही हे अधिका-यांना माहित असते. त्यामुळे त्याप्रमाणेच ई-टेंडरींग प्रक्रिया वेळेत केली पाहीजे.

**४)** मा.अति.आयुक्त यांना सभापतींनी फोन केल्यास ते उचलत नाहीत. स्थायी समिती वारंवार अपमान सहन करुन घेणार नाही. म्हणून स्थायी समितीची मागणी असेल की, अति.आयुक्तांना शासनात परत सेवेत पाठवावे.

**५)** आजपर्यंत जे ४५ विषय मंजूर केले आहेत, त्यात प्रभागांतील उद्यानांच्या निविदा प्रक्रियेत किती जणांनी सहभाग घेतला आहे, त्या सगळ्या संस्थांची नावे पुढील वेळी सभेत येताना घेऊन यावीत. यात किती क्लिअर काम करतो आणि किती भ्रष्टाचार करतो हे पुढील सभेत दाखवून दिले जाईल. पुढील निविदा प्रक्रिया होईपर्यंतच द्या, असे सांगूनच हे सदस्य प्रस्ताव मंजूर केले आह्त. तरीसुद्धा या ठरावांची अंमलबजावणी होत नाही. अधिकारी स्थायी समिती सभापतींचा फोन घेत नाहीत,रिकॉल करत नाहीत, मेसेज टाकत नाहीत.

६) मा.खोराटे साहेब यांना सांगणे आहे की, सगळे पॅरा अपिलात गेले पाहीजेत. ज्या-ज्या संस्थांनी एकच चलन चार बीलांवर वापरले, त्यांच्याबाबतीत काय करता येईल ते कोर्टाच्या निदर्शनास आणून द्यावे. बँकांकडून याचे पूरावे घ्या.

७) मा.आयुक्त सो. यांना सांगणे आहे की, उद्या मा.खोराटे साहेब व मा.पवार साहेब यांचे दोघांचे काम पूर्ण होऊन ऍड.गिरीष गोडबोले यांची महापालिकेच्या वतीने नियुक्ती झाली पाहीजे.

८) मा.पवार साहेब आपणास सांगणे आहे की, उद्या सर्व मॅटर मिटला पाहीजे. सिनिअर कौन्सिल नेमावा. सगळे फॅक्टस् शोधून ते त्यांच्यासमोर मांडावेत

९) मा.इंदलकर साहेब, आपणाला सांगितलेले काम वेगाने पूर्ण करावे.

१०) मा.दूरगुडे मॅडम यांना आहे त्याच पदावर अन्य विभागात किंवा प्रशासनात घेता येईल का याबाबत प्रशासनाने विचार करावा.


११) उद्या सहा प्रभाग अधिका-यांनी एकत्र बसून हा विषय सॉर्ट आऊट करुन घ्यावा.

-------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७२/२०१७
दिनांक - २८/०९/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(मा.स्थायी समिती ठ.क्र.९३३ दि.१३/०९/२०१७ चे लगत)**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411 018**

**महिला व बाल कल्याण योजना**

**प्रपत्र अ**

**महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V.) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग) (T.R.) प्रशिक्षण देणेबाबत.**

**महिला लाभार्थ्यांसाठी पात्रता निकष (अटी व शर्ती)**

१. महिला / मुलीच्या नावे आधारकार्ड / आधारकार्ड काढले बद्दलची पोच पावती ची साक्षांकित सत्यप्रत आवश्यक.

२. पिं.चिं.म.न.पा.हद्दीत वास्तव्य असणे आवश्यक.

३. वास्तव्याच्या पुराव्यार्थ महिलांच्या नावे/नाव असलेले :- आधारकार्ड/आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती/घरपट्टी (मिळकतकर) पावती/पिं.चिं.म.न.पा.कडिल झोपडपट्टीधारक म्हणुन ओळखपत्र/मतदार ओळखपत्र/विद्युत बिल/टेलिफोन बील/ राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक/रेशनकार्ड. यापैकी कोणताही एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) पुराव्यार्थ सादर करावे लागेल.

४. वय वर्ष २० पूर्ण असणे आवश्यक पुराव्यार्थ जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. प्रमाणपत्र, इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

५. इयत्ता ८ वी पास असणे आवश्यक. पुराव्यार्थ शैक्षणिक अर्हते संबधितचा दाखला (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

६. एकुण प्रशिक्षण शुल्काच्या १०% इतकी रक्कम सहभाग शुल्क म्हणुन आगाऊ भरणे आवश्यक.

७. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न १,००,०००/- पर्यंत असणे आवश्यक उत्पनाचे पुराव्यार्थ मा.तहसिलदार/तत्सम अधिका-यांकडील उत्पन्नाचा दाखला./पिवळे व केशरी रेशनकार्डवरील रक्कम रुपये १,००,०००/- पर्यंतचे नमूद उत्पन्न (साक्षांकित सत्यप्रत.) आवश्यक.

८. शिकाऊ अनुज्ञाप्तीसाठी २ व पक्की अनुज्ञाप्तीसाठी २ असे नजिकच्या कालावधीत काढलेले एकुण ४ फोटो (पासपोर्ट साईज) आवश्यक.

९. याव्यतिरिक्त परिवहन कार्यालयाच्या मागणीनुसार आवश्यक ती कागदपत्रे/साक्षांकित सत्यप्रत सादर करणे बंधनकारक राहील.

१०. नाव बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय राजपत्र, रक्कम रुपये १००/- चे स्टँम्प पेपर वरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

सही/-

**आयुक्त.**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**

**पिंपरी-१८**